"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

**।। उद्यमेन विना राजन् न सिध्यन्ति मनोरथा :।।**

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

| क्रमांक २ | वर्ष : ४३ | जुलै–सप्टेंबर २०२१ |
|---|---|---|

**BOOK POST**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

MSIPL

**MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD**

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058

Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian E quity market has given avege 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# SHREE HOMOEOPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,

Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## संपादकीय

# ठाणे मंच रौप्य महोत्सवी वर्ष

मुलुंड–ठाणे, डोंबिवली–कल्याण या मुंबईच्या पूर्व उपनगरांतील ज्ञातिबांधवांनी एकत्र येऊन आपापसांत एकोपा व सौहार्द निर्माण करण्यासाठी तेथील काही उत्साही तरुण मंडळींनी पंचवीस वर्षापूर्वी ठाणे मंचची स्थापना केली. त्यावेळचे संघाचे अध्यक्ष श्री. अरविन्द नाडकर्णी यांनी नैतिक व आर्थिक पाठबळ देऊन त्यांना उत्तेजन दिले. मुखपत्रिकेतून सुध्दा यांच्या विविध कार्यक्रमांना प्रसिध्दी देण्यात आली. वर्षांतून दोन वेळा म्हणजे श्रावणांतील हळदीकुंकू व मकर संक्रांतीचा तिळगूळ समारंभ यांमुळे महिलांना एकत्र येऊन गप्पा मारायची संधी मिळाली. दरवर्षी मुंबईच्या जवळच एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी एका दिवसाची सहल आयोजिण्यांत येत असे व सर्वजण खास कारवारी भोजनासह संपूर्ण दिवस आनंदात व्यतीत करीत. वसंतोत्सवात एखाद्या सभागृहांत सांस्कृतिक कार्यक्रम ठेऊन ज्ञातींतील कलाकारांच्या सुप्त गुणांना सादर करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे मंचाने कार्य केले. ज्येष्ठांसाठी दोन दिवसाची शिबीरे भरवून मनोरंजनातून समाजप्रबोधनाचे व ज्ञानप्राप्तीचे उपक्रम आयोजिण्यात आले व महत्त्वाचे म्हणजे वधूवर संशोधन केन्द्र सुरू करून अनेक मातापित्यांची सोय केली. त्याला पूरक म्हणून वधूवर परिचय मेळावे सुध्दा भरविण्यात आले.

मंचाची स्थापना २५ ऑगस्ट १९९६ रोजी झाली म्हणजे २५ ऑगस्ट २०२० ते २५ ऑगस्ट २०२१ हे रौप्य महोत्सवी वर्ष. या वर्षभरांत थाटामाटानें विविध कार्यक्रम भरविण्याचा ठाणे मंचाचा मानस होता. कित्येक कलाकारांनी दूरध्वनीवरून आपली कला सादर करण्याची इच्छा प्रकट केली. त्यानुसार विविध प्रकारच्या स्पर्धाही भरविण्यात येणार होत्या; पण मार्च २०२० पासून सुरू झालेल्या करोनाच्या लाटेत सर्व व्यवहार विस्कळीत झाले व नाईलाजाने सर्व कार्यक्रम रद्द करावे लागले. रविवार दि.६ जून २०२१ रोजी दादर येथे सांगता व समारोप समारंभ आयोजिला होता तोही रहित करावा लागला. त्याप्रसंगी स्मरणिकेचेही प्रकाशन होणार होते व त्यासाठी अनेक मान्यवरांनी लेखही पाठविले होते. आता स्मरणिकेचे प्रकाशन लांबणीवर पडले आहे.

आता करोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता असल्याने पुढील वर्षभरही कांही कार्यक्रम होणार नाहीत. पुढच्या वर्षी श्री मंगेश शांतादुर्गेच्या कृपेने सर्व काही सुरळीत झाल्यावर नेहमीचे कार्यक्रम थाटामाटांत सुरू करण्यासाठी पावले उचलण्यात येतील. तो पर्यंत ठाणे मंचावर सर्वांचा लोभ आणि आशीर्वाद असणार याची खात्री आहे.

देव बरे करू.

द.गो.नाडकर्णी



# ठाणे मंच रौप्यमहोत्सवी वर्षाची वाटचाल

२५ ऑगस्ट १९९६ रोजी ठाणे मंचाची स्थापना झाली आणि पहिला स्थापना दिन ठाण्यातील 'सहयोग मंदिर' येथे साजरा झाला. पूर्व उपनगरातील ज्ञातिबांधवाना एकत्र आणून आनंद उपभोगणे आणि सलोखा राखणे हेच उद्दिष्ट समोर ठेवून ठाणे मंचाची स्थापना झाली.

मंडळातर्फे दरवर्षी एक दिवसाची सहल, ज्येष्ठ नागरिकांसाठी २ रात्री राहाण्याची सहल, वर्षातून २ हळदीकुंकू समारंभ (१) संक्रांत हळदीकुंकू (२) श्रावण महिन्यातील हळदीकुंकू तसेच वधूवर सूचक मंडळ असे विविध कार्यक्रम गेले २५ वर्ष सातत्याने राबविले गेले. २–३ वर्षापासून 'वधूवर सूचक परिचय मेळावा' भरविण्यात आला. त्यास ज्ञातिबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध गाण्यांच्या धुंद मैफली 'सुरभी' ठाणे व पुणे येथे आयोजित केल्या गेल्या. 'वसंतोत्सव मेळावा' 'सत्यनारायणाची पूजा' 'गाणी व नृत्य' यांचे कार्यक्रम तसेच 'वधूवर सूचक मंडळ' चालविण्याऱ्या महिलांचे कौतुक समारंभ ठाणे मंचाने सादर केले.

ऑगस्ट २०२०–२१ हे वर्ष 'रौप्यमहोत्सवी वर्ष' म्हणून साजरे करविण्याचे ठरविले होते पण आपण ठरवितो ते सत्यात उतरते असे नाही. आणि २० मार्च २०२० पासून करोना नामक व्हायरसचा उद्रेक होऊन त्याने संपूर्ण जगाला वेठीस धरले आणि लाखो लोकांचे बळी गेले. देशभर लॉकडाऊन सुरु झाला. त्यामुळे ठरविलेले सर्व कार्यक्रम रद्द करावे लागले.

जगासमोर असलेल्या या संकटावर मात मिळवून पुन्हा एकदा आपण एकत्रित येऊन आपला 'रौप्यमहोत्सवी कार्यक्रम' साजरा करू तोपर्यंत सर्वांनी काळजी घ्यावी.

सुषमा सुबोध मुळगावकर, मुलुंड
९८१९८ ३६४७३

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | |
|---|---|
| १. श्रीमती सुलभा दिनकर कुलकर्णी, ठाणे | १,००० |
| २. श्रीमती अपर्णा सदानंद देसाई, ठाणे | ५,००० |

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| नीरज रवींद्र बोरकर, देवनार | व | तेजल गिरीश बोरकर, पुणे |
| ऋत्विक मंगेश कुळकर्णी, अंधेरी | व | ऐश्वर्या विद्याधर बेडेकर, ठाणे |
| ऋचिरा महेश पिंगे, अंधेरी | व | देवेन्द्र हेबळे, पुणे |
| अमेय जगदीश तेलंग, मीरारोड | व | प्रियंवदा दयानंद कोटणीस, ठाणे |

## प्रकाश झोत

### ख्यातनाम उद्योजक श्री. सतीश वाघ यांच्यातर्फे लोटे परशुराम येथे अद्ययावत कोविड उपचार केन्द्र

सरस्वती बाग, जोगेश्वरी, येथे ज्यांचे बालपण गेले, तेथील श्री. सतीश वामन वाघ हे एक यशस्वी उद्योजक म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांना वेळोवेळी मिळणाऱ्या पुरस्कारांचा तपशील मुखपत्रिकेत येत असतो. कोरोनाची वाढती रुग्णसंख्या पाहता ती आटोक्यांत आणण्यासाठी एम्. आय.डी.सी. च्या लोटे परशुराम या औद्योगिक वसाहतींत त्यांची सुप्रिया लाईफ सायन्स ही कंपनी कार्यरत आहे त्या कंपनीतर्फे गेल्या मे महिन्यांत तेथे अद्ययावत कोविड उपचार केन्द्र सुरु केले. त्यासाठी कंपनीने पन्नास लाखाचे अनुदान दिले आहे. याबद्दल प्रशासनाकडून व जनतेकडून त्यांचे कौतुक होत आहे. ३० आय. सी. यू. बेड्स व ऑक्सिजन पुरवठा या केन्द्रात उपलब्ध आहेत. याचा फायदा त्या परिसरांतील ग्रामस्थांना होत आहे.

**तौक्तेच्या भीषण वादळांत हेलीकॉप्टर पायलट निहाल सबनीस याचे अतुलनीय शौर्य.**

आपल्या संघाचे माजी उपाध्यक्ष श्री. महादेव सबनीस यांचा नातू व माहीम येथील सौ. बीना व श्री. प्रदीप सबनीस यांचा मुलगा निहाल हा नेव्हीच्या हवाई विभागात सिनीयर हेलीकॉप्टर पायलट, कमांडर, या पदावर कार्यरत आहे. मागे नॅशनल डिफेन्स अकेडमी, खडकवासला व नॅव्हल अकेडमी, गोवा यांच्या संयुक्त प्रवेश परीक्षेत तो संपूर्ण भारतात गुणवत्ता यादीत २५ व्या क्रमांकाने उतीर्ण झाला होता. नंतरच्या चाचणी परीक्षेतून नौदलाच्या हवाई विभागात त्याची निवड झाली.

अलीकडे तौक्तेच्या भीषण वादळांत मच्छिमार बांधव, खलाशी व कामगार खवळलेल्या समुद्रांत अडकून पडले होते. यावेळी आय. एन. शिक्रा या युध्दनौकेच्या, हेलीपॅडवरून जीवाचा धोका पत्करून निहाल याने अनेकांचा जीव वाचवला. त्याने दाखविलेल्या प्रसंगावधानाबद्दल व अतुलनीय शौर्याबद्दल वरीष्ठांनी निहालचे मुक्त कंठाने कौतुक केले.

**डॉ. महेश संझगिरी यांचे दोन संशोधन लेख.**
**आंतरराष्ट्रीय वन्यजीवन परिषदेमध्यें सर्वश्रेष्ठ**

Rewild Institute व्हिएना या संस्थेतर्फे १६ ते २३ ऑक्टोबर २०२० या दरम्यान वन्यजीवन संदर्भात एक परिषद भरविण्यात आली होती. या आभासी वेबीनार मध्यें तीस राष्ट्रांतील तीनशे संशोधकांनी भाग घेतला होता व पंधरा हजार प्रेक्षक सहभागी होते. या परिषदे अंतर्गत वेगवेगळ्या विषयांवर तज्ज्ञांनी संशोधनपर लेख लिहिले होते. त्यावेळी वन्यजीवन व पर्यावरण क्षेत्रांतील पार्ल्यातील निसर्गप्रेमी तज्ज्ञ डॉ. महेश संझगिरी यांनी दोन विषयांत संशोधन पर लेख सादर केले व ते दोनही लेख त्या त्या विषयांतले सर्वश्रेष्ठ म्हणून गणले गेले.



## । मी, माझे मन, काही सवाल ।
## ।। हिंदूहायस्कूलच्या मास्तरांची कमाल ।।

माझे मनच सांगते की मी स्वत:ला एक चांगला ‘लेखक’ असे समजण्याच्या अजिबात लायकीचा नाही. वयाची पंचाहत्तरी ओलांडल्यानंतरची ही हकीकत आहे. माझा परममित्र ‘तोत्या’ (श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी) म्हणाला की आपल्या हिंदूहायस्कूलवर काही लिहिता आले तर प्रयत्न कर. क्षणभर मन अगदी भारावून गेले आणि माझ्या शालेय जीवनांत प्रवेश करते झाले.

हिंदूहायस्कूल माझ्या दृष्टीने एक पवित्र मंदिरापेक्षा कमी नव्हते. आमच्या शिक्षकांसमोर देवदूतही फिके पडत असावेत ! अशा पवित्र वातावरणांत मी पाच वर्षे काढली होती. तेथील संस्कार माझ्या मनावर असे कोरले गेले की नंतरच्या आयुष्यांत–‘ सुख म्हणजे काय असते रे ?’ या वाक्यांत जी काही सुखे समावली आहेत ती मी अगदी सर्वतोपरी भोगलेली आहेत. सर्व प्रकारच्या ऐहिक सुखांचा मी अगदी मनसोक्त उपभोग घेतला आहे आणि अजूनही घेत आहे. पण तरी सुध्दा हिंदूहायस्कूलचे महान पावित्र्य माझ्या मनातून जरासुध्दा कमी झाले नाही. उलट ते जास्तीच उजळून माझ्या मनाच्या एका कोपऱ्यांत दडून बसले आहे. आज माझ्या वयाच्या ८२ व्या वर्षीसुध्दा मला हिंदूहायस्कूलच्या पवित्र वातावरणांत काढलेल्या १९५० ते १९५४ या पांच वर्षातील प्रत्येक क्षण आठवतो.

मी त्यांतील काही क्षणांची माझ्या पहिल्या लेखांत केवळ आठवण केली आणि मला असे सांगण्यात आले की तो लेख फारच सुरेख होता. मला असेच लेख लिहिण्याची विनंती करण्यांत आली. हीच माझ्या लेखनाची सुरुवात !

मी जरी जातीवंत लेखक नसलो तरी बऱ्या वाईट अनुभवांचे प्रचंड भांडार माझ्या गाठीशी आहे ! एक विचार मनांत आला की या भांडारातील सांगण्यासारख्या अनुभवांचे प्रामाणिक अनुमोदनच कदाचित लेखस्वरुपात उतरु शकतील आणि नेमके तेच मी केले.

मी भले लेखक जरी नसलो तरी जीवनांत सर्वतोपरी एक बऱ्यापैकी यशस्वी जी. एस. बी. निश्चितच आहे. माझ्या प्रत्येक लेखांत माझा अनुभव लिहितांना मी केवळ सत्याचीच कास धरली ! शिवाय लिहितांना वाचकांच्या मनात कशा प्रकारच्या शंका निर्माण होतील याचीही मला पूर्ण जाणीव होती. या शंकाचे निरसन करण्याचा मी त्याच लेखात प्रामाणिकपणे प्रयत्नही करीत असे.

केवळ गुरुतुल्य हिंदूहायस्कूलमधील पाच वर्षांच्या साधनामय जीवनामुळे पुढील आयुष्यात आलेली असंख्य संकटे तसेच लोभस आकर्षणे–या सर्वांचा यशस्वी सामना करण्यांत

मला जरासुध्दा कष्ट पडले नाहीत. केवळ आमच्या हिंदूहायस्कूलमधील परमपूज्य गुरूजींचे शांत आणि तेजस्वी चेहरे आठवायचे–हाच अगदी रामबाण इलाज असे–यथोचित उपाय–योजनांचा मार्ग आपोआपच नजरेसमोर येई.

हिंदूहायस्कूलमधील पाच वर्षे आतापर्यंतच्या माझ्या वयाच्या ८२ वर्षांमधील फारच महत्त्वाची वर्षे ठरली गेली. पण या पांच वर्षात निर्माण झालेल्या माझ्या मनांतील काही सवालांना समर्पक उत्तरे मिळण्यास जवळ जवळ ४३ वर्षे लागली–१९९७ साल उजाडावे लागले.

**हेच ते काही सवाल !**

१) आम्हाला हिंदूहायस्कूलमध्ये शिकवणारे काही मास्तर माझ्या वडिलांचे (बाबांचे) शाळेतील वर्गमित्र होते. किंबहुना, अभ्यासांत, तसेच एकंदर शालेय प्रगतीत कदाचित माझ्या बाबाहून सरसही असू शकतील. सारे नंतर यशस्वीरीत्या बरोबरच पदवीधर झाले. इतकेच नव्हे काही मास्तरांनी 'मास्टर्स' डिग्रीपण नंतर मिळवली. पण दैवयोग बघा ! माझे बाबा रिझर्व बँकेत एक्सचेंज कंट्रोल डिपार्टमेंटमध्ये सर्वोच्च पदावर– कंट्रोलर झाले आणि त्यांचे वर्गमित्र हिंदूहायस्कूलमध्ये मास्तरच राहिले !

२) या शापित देवदूतांनी शिकवलेली हजारों मुलें मोठमोठे शासकीय अधिकारी, इंजिनियर्स, डॉक्टर्स, सर्जन्स, वकील न्यायाधीश, यशस्वी कारखानदार, जगप्रसिध्द शास्त्रज्ञ झाले आणि या सर्वांना त्या योग्यतेपर्यंत मजल मारण्यासाठी पाया रचणारे हिंदूहायस्कूलमध्ये मास्तरच राहिले.

३) त्यांनी शिकवलेले विद्यार्थी देशांतच नव्हे तर परदेशांतही फार मोठ्या नावलौकिकास पात्र झाले पण या सर्व गोष्टींना जबाबदार असणारे हिंदूहास्कूलमध्यें मास्तरच राहिले !

४) अनेक विद्यार्थी शालांत परीक्षेंत सबंध एस. एस. सी. बोर्डांत अव्वल ठरले गेले. त्यांचे तसेच हिंदूहायस्कूलचे नांव केवळ महाराष्ट्र – कर्नाटकांतच नव्हे तर भारतभर प्रसिध्द झाले. पण त्या तल्लखमूर्तींना योग्य आकार आणि जगमान्य घडविणारे, चुपचाप एकांतात, त्या आपल्या विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल ईश्वराचे स्वत:च्या भरल्या डोळ्यांनी, उपकार मानणारे हिंदूहायस्कूलमध्ये मास्तरच राहिले !

५) एक वास्तविकता मला नेहमीच सतावीत असे आणि ती म्हणजे आर्थिकदृष्ट्या असलेली प्रचंड तफावत–हिंदूहायस्कूलचे मास्तर आणि त्यांचे माजी विद्यार्थी यामधील. माझ्या शालेय जीवनांतील शेवटच्या वर्षी–१९५४ साली, मला खात्री आहे, मुंबई व इतर शहरांतील शाळामास्तर शिकविण्या, स्पेशल क्लासेस वगैरे नाना मार्गांनी बरीच माया गोळा करीत असत. हिंदूहायस्कूलच्या मास्तरांना त्याची अर्थात पूर्ण जाणीव होती. परंतु हे सर्व जाणूनसुध्दा केवळ



आपल्या विद्यार्थ्यांचे यशच त्यांनी आपले पारितोषिक ठरविले होते ! हिंदूहायस्कूलच्या मास्तरांनीसुध्दा विद्यार्थ्यांच्या गरजा आणि आवश्यकतेनुसार स्पेशल क्लासेस वगैरे घेतले होते. पण विनामूल्य ! केवळ या ठामवृत्तीनेच ते शेवटपर्यंत हिंदूहायस्कूलमध्ये मास्तरच राहिले !

**या हजारों विद्यार्थ्यांची अस्मिता काय गायब झाली होती ?**

**अजिबात नाही !**

आज वयाच्या ८२ वर्षीसुध्दा, मला आमच्या हिंदूहायस्कूलमधील पूजनीय मास्तरांच्या आठवणीच कशाला, त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभावही आठवतात. कारवारला झालेल्या हिंदूहायस्कूलच्या शतकमहोत्सवांत काही कारणांमुळे सहभागी होऊ न शकलेल्या श्री. एम्. एस्. वागळे मास्तरांचा सत्कार करण्यासाठी माहीमला, तेंडूलकर हॉलमध्ये १९९७ साली एक समारंभ आयोजित केला होता आणि या समारंभाला भारतभर पसरलेल्या हिंदूहायस्कूलच्या त्यांच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.

वागळे मास्तरांना, तेंडूलकर हॉलच्या प्रवेशद्वारापासून स्टेजपर्यंत पोचण्यांत जवळ जवळ एक तास लागला. सर्व माजी विद्यार्थ्यांची, आपल्या दैवताच्या पायावर लोळण घेण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली होती. माझा एस.एस.सी. क्लासमधील वर्गबंधू आता पुण्यातील एक सुप्रसिध्द डॉक्टर नासिरुद्दीन युनुस काझी. त्याला १९९७ मध्ये, म्हणजे ४३ वर्षानंतर तेंडूलकर हॉलमध्ये वागळेमास्तर विचारतात–'तुला एस.एस. सी.त संस्कृतमध्ये १९५४ साली हायेस्ट मार्क मिळाले होते ना ?' अतीप्रेमाने वागळेमास्तरांनी नासिरुद्दीनच्या डोक्यावर हात ठेवलेला बघितला. मला वाटते नासीरुद्दीनने या प्रसंगानंतर महिनाभर तरी डोक्यावरून आंघोळ केलेली नसावी !

सबंध विद्यार्जनांत शालेय तसेच मुंबई विद्यापीठांत, कधीही पहिला नंबर न सोडलेले, महाराष्ट्र राज्याचे 'चीफ सेक्रेटरी ' या सर्वोच्च शासकीय पदावरून, अत्यंत यशस्वी कारभारानंतर, निवृत्त झालेले सिनीअर आय. ए.एस. अधिकारी, हिंदूहायस्कूलचे विद्यार्थी–श्री. प्रभाकर दत्तात्रय कसबेकर (Mr. P. D. Kasbekar) यांच्या अध्यक्षतेखालीच हा समारोह आयोजीत केला होता. १९३८ साली श्री. प्रभाकर कसबेकर, मॅट्रीक परीक्षेतही, मुंबई विद्यापीठातुन पहिले आलेच होते. तसेच इंटर आर्टस, बी. अे. परीक्षेतही, मुंबई विद्यापीठातुन पहिले आले. १९४० च्या इंटर आर्टस परीक्षेत, श्री. कसबेकरांनी मुंबई विद्यापीठांत एक रेकॉर्ड निर्माण केला आहे व तो ८० वर्षानंतरसुध्दा अजूनही आबाधित आहे. श्री. कसबेकरांना इंटरआर्टस परीक्षेत सर्वच्या सर्व आठही पेपर्समध्ये सर्वाधिक मार्कस् मिळाले होते. त्यांनी श्री. चिंतामणराव देशमुखांचा (Mr. C. D. Deshmukh) आधीचा रेकॉर्ड तोडला होता. श्री. देशमुखांना आठपैकी सहा पेपर्समध्ये सर्वाधिक मार्कस् मिळाले होते.

श्री. कसबेकरांची, आपले परमपूज्य गुरुजी वागळेमास्तरांना स्टेजवरच सर्वांच्या साक्षीने साष्टांग नमस्कार घालण्याची आत्यंतिक इच्छा होती. पण अतीगर्दीमुळे ते शक्य झाले नाही. याबद्दल त्यांनी आपली ही खंत, व्यक्तही केली होती. तरीसुध्दा स्वत: भाषण देताना मध्येच, वागळे मास्तरांचे पदस्पर्श, नव्हे परीसस्पर्श करून त्यांचे खास आशीर्वाद घेण्यांत ते सफल झालेच. या समारंभाला नामांकित यशस्वी व्यावसायिक हिंदूहायस्कूलमधले माजी विद्यार्थी भारताच्या कानाकोपऱ्यातून आले होते. इतकेच नव्हे ! केवळ आपल्या जित्या जागत्या परमेश्वराला प्रत्यक्ष भेटण्यासाठी, त्यांच्या पदस्पर्शासाठी, त्यांचे अमृततुल्य बोल ऐकण्यासाठी, युरोप-अमेरीकेहूनही बरेच विद्यार्थी जमले होते.

सर्वांच्या कमालीच्या उजळलेल्या चेहऱ्यांनी, केवळ प्रेमाने आणि श्रध्देने तसेच ओतप्रोत आदरांश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी त्यांचे हिंदूहायस्कूलच्या मास्तरांवर-नव्हे! शिक्षकांवर-नव्हे ! परमपूज्य गुरूजींवर किती आत्मीयता, श्रध्दा आणि प्रेम आहे याची पावती दिली.

**अशाप्रकारचे दैवतुल्य भाव, एकाचवेळी, शेकडो विद्यार्थ्यांच्या डोळ्यात दिसणे केवळ हिंदूहायस्कूलच्या गुरूजींच्या अतूट तपश्चर्येचेच फळ आहे. ते केवळ पैशाने, हुद्याने किंवा कुठल्याही प्रकारच्या प्रसिध्दीने मिळत नाही. त्यासाठी सबंध आयुष्य केवळ विद्यादानाचे व्रत मनापासून, कुठल्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करता, साकारणेच आवश्यक ठरते.**

आणि माझ्या मनांतील सर्व सवालांची परीपूर्ण उत्तरे मला मिळाली. हिंदूहायस्कूलमधील गुरूजी शापित देवदूत नव्हते ! ते महान तपस्वी होते !!

**A Creator is always superior than his creations.**
**निर्माता हा त्याच्या निर्माणापेक्षा नेहमीच जास्त पूजनीय असतो.**

खरोखर ! माझी पिढी किती भाग्यवान ! हिंदूहायस्कूलच्या परमपूज्य गुरूजींनी आम्हां विद्यार्थ्यांच्या जीवनाला आगदी योग्य वेळी, सर्वतोपरी यशस्वी मार्ग दाखविला. केवळ ज्ञानवृध्दीतच नव्हे तर जीवन परीपूर्ण जगण्यांत आवश्यक असे अनेक बहुमूल्य गुण-सत्य, आत्मसंयमन, निस्वार्थ वर्तन आणि परोपकार तेही कुठल्याही प्रकारच्या परतफेडीची अपेक्षा न करता ! अक्षरश: तसे जीवन स्वत:च जगून त्यांनी प्रात्यक्षिक उदाहरण दिले.

धन्य ते हिंदूहायस्कूलचे पूज्य गुरूजी आणि नशीबवान आम्ही विद्यार्थी !

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२ ९१३६५ / ८७७९९ ८६६०६**





# सुशांता - शिवानंद तेलंग
# विवाह सुवर्ण महोत्सव

**पन्नास वर्षांपूर्वी देवाने सुशांता-शिवानंद यांची गाठ बांधली.**
**लक्ष्मीच्या आगमनाने तेलंगांच्या घराची भेग सांधली.**
हा-हा म्हणता पन्नास वर्षे गेली,
विशीतून आता दोघं सत्तरीत उतरली.
दोघांनी मिळून श्रम खूप केले,
आज मात्र वाटते की ते कष्ट फळास आले.
कठीण आयुष्य हळूहळू बहरले,
आव्हानात्मक दिवस हळूहळू संपले.
मुलांना चांगली शिकवण देऊन त्यांना पायावर उभे केले,
वळून पाहता वाटते, कसे ते दिवस गेले.
**देवाची व गुरूंची साथ आणि थोरा-मोठ्यांचे आशीर्वाद,**
**त्याच बरोबर मिळाला मुलांचा प्रतिसाद.**
सुशांताला सुवर्णाची भारी हौस,
आज तिच्या पदरात पडला सुवर्णाचा पाऊस.
कुणी काय कमवले, कुणी काय गमवले,
आता सर्व हिशेब काळात हरवले.
**पुढे दिसत आहेत सुखा समाधानाचे दिवे,**
**एकमेकांची साथ असली की आणखी काय हवे ?**
आज आई बाबांच्या लग्नाच्या सुवर्णमहोत्सव दिनी
देवाकडे हीच प्रार्थना,
दोघांनाही सुखी व निरोगी ठेव, हीच मनोकामना.

**- सौ. समिधा(उमा) समीर पंडीत,**
दादर



# विस्मृतीत हरवलेला माझा गाव 'अगळी'

या 'लॉक डाऊन' च्या काळात घरबसल्या माझे बरेच लेखन झाले. पण मनात एक रुखरुख होती. ८४ वयाच्या उत्तरंगीसुध्दा माहेराच्या आठवणी मनात दाटल्या होत्या. पण आज माझ्या 'विस्मृतीत' हरवलेल्या गावाबद्दल थोडे लिहावसे वाटले. आम्ही 'अगळी'चे नाडकर्णी म्हणून परिचित आहोत. माझ्या नाडकर्णी परिवाराने महाराष्ट्रातच नव्हे गोवा, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या कीर्तीत भरपूर भर टाकली. आम्ही गौड सारस्वत ब्राह्मण थोडक्यात G.S.B. हे छोटे नाव. पण माझा 'अगळी' गाव मात्र अपरिचित राहिला. निदान आमची तिसरी व चवथी पिढी हा लेख वाचतील अशी अपेक्षा करते.

हिरव्यागार वनश्रीने नटलेले आणि सह्याद्रीच्या कुशीत शांतपणे विसावलेले कॅनरा जिल्ह्यातील एक खेडे म्हणजे 'अगळी' होय. गावाच्या जवळून 'काळी नदी' वाहते. तिथे तिचा डोह खोल म्हणजे 'अग्गड' आहे. काळीनदी पुढे अरबी समुद्राला मिळते त्यामुळे तिचे पाणी 'खारे' आहे. नदीच्या दोन्ही तीरावर 'कांदला'ची व इतर झाडी असल्यामुळे या झाडांची सावली नदीच्या पात्रात पडते व पाणी काळे दिसते म्हणून तिला 'काळीनदी' नाव पडले असे ऐकिवात आहे. 'कद्रे' या गावाजवळ 'कैगा प्रॉजेक्ट' मुळे ही नदी रडवेली होऊन संथ वाहते. माझ्या बालपणी 'सायमोरी, शेवटे, शेतके, नगली, खापी' वगैरे माश्यांची खैरात असायची. 'हुंवारा' म्हणजे पावसाळ्यात 'पूर' आला की गावकऱ्याना भरपूर सरपण मिळायचे.

माझा गाव अगळी एक नयनरम्यखेडे असून डोंगराच्या उतारावर वसलेले आहे. खाली सपाट भूमीवर लोक शेती करायचे. आमचा 'बामणवाडो' जवळच 'आंब्यालो वाडो' आंबी म्हणजे कोळी समोर 'पिपळा मकी' नंतर 'सोनार वाडो', 'गुनग्या वाडो' आणि 'नासा फातर' एवढीच हद्द ती 'कातन्या' पर्यंत. छोटीशी टेकडी पण लोक तिथे कोंबडी वगैरे कापायचे. इथे छोटासा धक्का होता. होड्या, लाँच वगैरे इथेच थांबतात.

आमच्या इथे पलीकडे 'किन्नर' गावाला जायचे असेल तर 'रघुमामा' एका 'तोळक्या'तून म्हणजे छोट्या होडीतून सोडत असे. त्या मोबदल्यात लोक भात, पैसे वगैरे देत असत. किन्नर गावच्या छोट्या डोंगरावर लिंगायत लोकांचे 'विश्वेश्वरा'चे देऊळ आहे. तिथे जत्रेला आम्ही जात असू. नदीच्या काठावर वसलेले सर्व गाव समृध्द होते. आमच्या 'देवतेमाळा'वर आंबा, काजू, कोकम, साग, तिरफळ, वटांब, करबेल या सर्वांची घनदाट वनराई. लोक आंबे, भिरंड वगैरे मागायला येत असत. प्रत्येकाच्या दारात झुलता

माड(नारळ) आणि भाजीपाला, फळे यांची रेलचेल होती.

आमच्या घराच्यामागे 'देवतेमाळ' म्हणजे वनराई. तिथे एक प्रचंड वृक्ष आहे. त्याचे नाव ऐकीवात नाही. त्याच्या बुंध्याशी घेरा घातलेली महाकाय 'वारुळे' असून ती सापाची निवासस्थाने आहेत. बुंध्याशी अनेक छोट्यामोठ्या देवदेवतांच्य मूर्ती आहेत. गावकऱ्यांचे ते 'श्रध्दास्थान' असून तिथे 'देवता' वास करते व ती नवसाला पावते असे म्हणतात. तिथे जाणे धोकादायक असल्यामुळे घराच्यामागे एक 'उंबरा'चे झाड आहे. तिथे देवतेला नवस बोलून पूजा करतात.

आमच्या शेतात 'ईश्वराचे लिंग' असून वर्षातून फक्त दोनदा म्हणजे 'दसरा' अन् 'अक्षयतृतीयेला' पूजा करतात. आमचे दादा सांगायचे की कोणीतरी पूर्वजाने आमच्या शेतात नांगर चालविताना एका दगडाला नांगर लागला व त्याचा तुकडा उडाला व भळाभळा रक्त वाहू लागले. नंतर अभिषेक केल्यानंतर रक्त थांबले. आजूबाजूला खोदल्यानंतर ते खोलवर आहे हे समजले. हे स्वयंभू 'लिंग' आहे. त्यामुळे रोज सायंकाळी देवतेच्या अन् लिंगाच्या नावाने सांजवात लावली जायची. घरी 'नवरात्र' आणि 'तुळशीविवाह' थाटात साजरा व्हायचा. 'महानमी'ला सगळे गावकरी जेवायला येत असत.

काळाच्या ओघात सगळे बदलेले. माझ्या बालपणीच माझे चुलते, चुलतचुलते अगळी सोडून परगावी गेले होते. त्यांनी आपली शेती, घरे कुळांना देऊन टाकली त्यामुळे आम्हा भावंडांना सगळे नातेवाईक परिचित नाहीत. माझे मोठे काका बालपणी गेले. पण 'कावाकाकी' आपल्या माहेरी होत्या. माझी आई शांताबाई सुशिक्षित असल्यामुळे गावातील सर्व मुलांना अनेक प्रलोभने दाखवून 'हळग्या'ला शाळेत पाठवले. पण मुलांना 'वती'चा डोंगर चढून शाळेला जावे लागे, माझ्या भावंडांनी हळग्याला प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतले. मी सुध्दा एक वर्ष माध्यमिक शाळेत (लहान वयात) इंग्रजी शाळेत मुलांना शिकवले.

माझे एक काका म्हणजे वामनकाका. ते शानभोग होते. त्यांचे सुपुत्र 'बाबुराय ऊर्फ महारुद्र' हे उच्च विद्याविभूषित होते. पुढे पिंपरीला 'हिंदुस्थान अँटीबायोटीक पेनिसिलीनच्या' कारखान्याला उर्जितावस्थेत आणायला त्यांचा सिंहाचा वाटा होता. पुढे हरिद्वार, मद्रास इथे एच्. ए. कंपन्या त्यांनी उभारल्या. धाकटे प्रभाकर हे सुध्दा विज्ञान शाखेचे पदवीधर होते. 'अॅबट' कंपनीत ते उच्चपदावर होते.रिटायर झाल्यानंतर 'गोव्या'च्या कोंकणी भाषेचा अभ्यास करून 'पाच पुस्तके'प्रकाशित केली. माझे दुसरे काका बाळकृष्ण



काका. त्यांना आम्ही 'बाळकाका' म्हणत असू. जोगेश्वरीत ते 'बाळमामा' म्हणून ओळखले जात. हे 'एलिफंटा ऑयल मिल'मध्ये अत्यंत उच्चपदावर होते. नवरात्रीसाठी ते व इंदिराकाकी येत असत. आमचे ते लाडके काका होते. कारण येताना भरपूर सुकामेवा अन् मिठाई घेऊन येत असत त्यांचे सुपुत्र राजा ऊर्फ विजय हे 'महिंद्रा'मध्ये उच्च पदावर होते. ते कॉलेजकडून क्रिकेट खेळत असत. आमच्या 'शांतकाका'चे मला वाटते तरुणपणी निधन झाले. आमची आत्या 'आवडाक्का' तिला कारवारला कामताकडे दिले होते. बालपणी सगळ्या आमच्या परिवाराशी जोडलो होतो पण आताही आम्ही बदललेलो नाहीत.

अगळीच्या नाडकर्ण्यापैकी आठवतात ते चुलतकाका मुकुंदकाका. त्यांचा सुपुत्र महेश हा निष्णात इंजिनियर होता व कन्या सुपरिचित शरदिनी उर्फ शुभदा तेलंग. कवयित्री म्हणून तिचे 'सुस्वागतम्' अन् 'प्रतिबिंब' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. दुसरे चुलतभाऊ के. पी. नाडकर्णी ते गव्हर्नरचे सेक्रेटरी असावेत. त्यांना 'काशण्णा' म्हणत असू. अॅडमिरल जयंत हे नेव्ही मध्ये होते. तर त्यांचे सुपुत्र रेअर अॅडमिरल रवीन्द्र हे सुध्दा नेव्ही मध्ये होते. जयंतचे बंधू ज्ञानेश्वर नाडकर्णी हे सर्वांना सुपरिचित होते. त्यांनी फ्रेंच व इंग्रजी भाषेत विपुल लेखन करून अनेक 'पुरस्कार' संपादन केले. माझ्या विस्मरणात अनेक भावंडे आहेत. ती मला आठवत नाहीत. तरी त्यांची क्षमा मागते. आमच्या अगळी नाडकर्णींच्या मुलीसुध्दा खूप शिकून त्यांनी नाव कमावलेले आहे. आज त्यांची नामावली लिहिणे अशक्य आहे.

मला आज एक व्यक्ती आठवते म्हणजे दादा व बाळकाका सांगत असत. त्यांचे एक मावसबंधु बालपणी घर सोडून संन्याशी झाले ते म्हणजे 'संन्याशीकाका' मला नाव आठवत नाही. ते पुढे गुजरात-गिरनार इथे गेले. ते दशनानी पंथाचे असून त्यांना 'प्रणवानंद सरस्वती' म्हणून ओळखले जात. पुढे अंकलेश्वर जवळ 'उम्मल' या गावी होते. १९६७ साली ते बाळकाकाकडे आले होते म्हणतात. असे म्हणतात की त्यांनी 'जलसमाधी' घेतली. हे सगळे ऐकिवात आलेले.

असा हा विस्मृतीत हरवलेला 'अगळी'गांव आणि 'अगळीचा नाडकर्णी परिवार' यांचा मला अभिमान वाटतो. या लेखात काही त्रुटी राहून गेल्यास क्षमा मागते.

हा माझा लेख नसून 'कांदला फुलांचा सोर' आहे तो अगदी मनापासून माझ्या माहेरच्या नाडकर्णी परिवारांना अर्पण करते.

**- कुंदा र. देसाई**
**९८१९० ५२३१९**

# प्रतिक्रिया
## 'वृध्दाश्रम – एक आनंदाश्रम'

मुखपत्रिका – एप्रिल २०२१ मधील 'वृध्दाश्रम – एक आनंदाश्रम' हा भाग वाचला.

प्रथम मला अरुण कसबेकर यांचे अभिनंदन करावयाचे आहे. कारण मागील काही अंकात त्यांनी अशाच आशयाचे म्हणजे ज्ञातीतील लोकांनी एकत्र येण्यासंबंधीचे बरेच विस्तृत विचार मांडले आहेत. आजच्या काळात कोणी इतका सखोल विचार, इतक्या आत्मीयतेने, आपल्या ज्ञातीबद्दल मांडणे हे अतिशय दुर्मिळ आहे. मुखपत्रिकेतील बहुतेक लेख हे आपल्या आठवणींची उजळणी किंवा सदिच्छा प्रकट करणारे असतात. काही मोजकेच लेख हे सकारात्मक, भरीव आणि भविष्याला भावतील असे असतात. कसबेकरांचे विचार मला त्यामुळेच खूप आवडले. माझा जन्म कारवार येथे झाला, पण आज मला तिथे आवर्जून जाण्यासारखे काहीच राहिलेले नाही असे वाटते. त्याला महत्त्वाचे कारण कारवार शहराकडून नोकरी व उद्योगधंदा यासाठी आलेली माझी पिढी. आता आमच्या नंतरची पिढी मुंबईहून परदेशात जात आहे. त्यामुळे त्यांनी कारवारला आत्मीयतेने भेट देण्यासाठी, कारवारची नैसर्गिक संपत्ती वगळतां, आपल्या कोंकणी / जीएसबी पूर्वजांनी, काही ठेवा न ठेवल्याची खंत मला जाणवते. आमच्या पहिल्या पिढीने शून्यातून जी झेप घेतली आणि आम्हाला जी योग्य दिशा दाखवली त्यात त्यांचे बहुतेक आयुष्य खर्च झाले, आणि आम्ही आमची महत्त्वाची वर्षे त्याचा आधार घेऊन पुढील पिढीस परदेशात पाठवण्यात घातली.

आपली गोव्यातील देवळे, बऱ्याच ठिकाणी स्थापलेले मठ आणि एनकेजीएसबी बँक, संघ आणि एज्युकेशन सोसायटी या सारख्या जुन्या, चांगल्या कार्यरत संस्था, यांच्यामुळे आपल्या पूर्वजांनी पुढील पिढी करता किती चांगले कार्य केले ते आपल्या सर्वांना माहीत आहेच.

आता मागे वळून पहातांना असे लक्षात येते की, आपण आपल्या कुटुंबाच्या भावी पिढ्यांकरीता आपल्या कारवारकडे अभिमान वाटेल असे काही सोडाच पण आठवणीकरतासुध्दा काहीही जपून ठेवू शकलो नाही. एवढेच नाही तर आपण आपल्या समाजाकडून सुध्दा कारवारमध्ये सामुहिकपणे काही भरीव कार्य किंवा वास्तु ठेवू शकलो नाही तर ती आपला सर्वांची आणखीन मोठी हार असेल. बहुतेक सर्व प्रगतशील व सुस्थितीतील समाजाने असे आपल्या पुढील पिढीसाठी आपल्या मूळ गावी, सामुदायिक असे कार्य केले आहे, काहीतरी ध्येय ठेवले आहे. त्यामुळे असे वाटले की कसबेकरांनी मांडलेले मौल्यवान विचार आपण पुढे प्रत्यक्षात आणायला हवेत. या साठी माझा सहभाग गृहीत धरावा.

कसबेकरांनी मांडलेला 'आनंदाश्रम' ही संकल्पना, त्याचे टोक धरून आपण त्यावर विस्तृत विचार करू शकतो. या संबंधी आपण एक विशेष सभा बोलावल्यास अनेकांना यावर आपले विचार मांडण्याची संधी मिळेल. सध्याच्या करोनाच्या महामारीच्या संकटातून आपणा सर्वांना सुखरुप ठेवावे, हीच देवाकडे प्रार्थना.

**– महेश आरस, पारले –९८२०१ ८५२०३**



# प्रतिक्रिया
## कुंदा कुळकर्णी

एप्रिल २०२१ च्या मुखपत्रिकेत जोगेश्वरीच्या अरविंद गंडभीर हायस्कूलच्या लोकप्रिय शिक्षिका व माझी मामी कुंदा कुळकर्णी हिच्या बद्दल लिहिलेला एक हृद्य लेख वाचनात आला. त्या लेखात तिच्याच कुटुंबातील इतरांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल कौतुकास्पद उल्लेख आहे. त्या संदर्भात मी आणखी एक अल्पशी माहिती नमूद करू इच्छिते. कुंदामामीची कन्या वर्षा कुलकर्णी सामंत ही सुध्दा शिक्षण क्षेत्राशी निगडीत आहे. तिनेसुध्दा मुंबईतील एका महाविद्यालयात मानसशास्त्र विषयाचे अध्यापन केले होते. सध्या ती अबूधाबी येथे शैक्षणिक क्षेत्रात समुपदेशक म्हणून कार्यरत आहे.

**– दीपाली (अनुप्रिता) विनायक वागळे,** माहीम
८१०४४७२३२२

### एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात आर्थिक साहाय्यासाठी गरजूंनी अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख नमूद करण्यात आली होती. सुधारित अंतिम तारीख आता पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| **इयत्ता १ ते १०** | **३० जुलै २०२१** |
| **इतरांसाठी** | **३० ऑगस्ट २०२१** |

### गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

प्रतिवर्षी नोव्हेम्बर महिन्याच्या शेवटच्या रविवारी भरणाऱ्या ज्ञातीसंमेलनाच्या समारंभात ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांचे जाहीर कौतुक करण्यासाठी बक्षिसे देण्याची परंपरा होती. आता कोविडमुळे नेहमीसारख्या परीक्षा भरविण्यात येत नसून वेगळ्याप्रकारे मूल्यांकन करण्यात येणार आहे. संमेलनही होणार नाही. म्हणून दहावी, बारावी व इतर परीक्षा उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या गुणपत्रिकांची फोटो कॉपी, पत्ता व संपर्क नंबरसह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयांत पाठविण्याची व्यवस्था करावी. कार्यकारिणी योग्य तो विचारविनिमय करून लाभार्थींना त्यांची बक्षिसे व प्रशस्तिपत्रके घरी पाठविण्याची व्यवस्था करील.

**अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख : ३० नोव्हेंबर २०२१**

# मी जाता, राहील कार्य काय ...

## ‘जन पळभर, म्हणतील हाय हाय,
## मी जाता राहील काय ... ’

भा. रा. तांबेची ही प्रसिध्द कविता आम्हाला शाळेत शिक्षक शिकवताना आम्ही भारावून जायचो. वातावरणच त्याकाळात भारदस्त असायचं. सदाचार, सेवाभाव, कर्तव्यदक्षता, परोपकार, आदर, साधनशुचिता, सत्संग, देवभक्ती या गुणांनी संपन्न असे व्यक्तिमत्व असणारे महापुरुष आपल्या कारवार गावात विपुल होते. कारवार हा छोटासा गाव पण कीर्ती महान ! या गावाने देशाला एक दिवाण बहादूर तीन रावबहादूर, एक सुप्रिम कोर्ट न्यायाधीश, तीन पोलिस महासंचालक, दोन जागतिक संशोधक, एक ॲडमिरल व दोन रिअर ॲडमिरल, दोन राज्यांचे चीफ सेक्रेटरीस, चार पद्मभूषण दिले. लिस्ट मोठी आहे. या सर्व महापुरुषांना ही भारांची कविता सर्वार्थाने लागू पडते. त्यांचाच आदर्श गिरवून आम्ही सगळे लहानाचे मोठे झालो. तसेच आम्हाला हिंदू हायस्कूल ह्या, काही महापुरुषांनी स्थापिलेल्या शाळेत ऋषितुल्य शिक्षकांचं मार्गदर्शन लाभून सगळ्यांनी आपापल्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली.

पण नंतरची... खरी शोकांतिका म्हणजे: हळुहळु ब्राह्मणवर्गाच्या या शेती-वाडी जमीनदार पिढीला स्वातंत्र्यानंतर गावातून स्थलांतर करावे लागले. सरकारने तडकाफडकी जमिनी हिरावून घेतल्यामुळे, विषम समाजव्यवस्थेमुळे, कूळकायदा व कानडी करणामुळे वगैरे कारणांनी आपला समृध्द समाज, आपल्या पूर्वजांनी भरभराटीला आणलेल्या कारवार या निसर्ग रम्य अशा प्रदेशाला मुकला. बहुतेकांनी मुंबईला स्थलांतर केलं व तीच आपली कर्मभूमी मानली. पण यामुळे कारवारला एक पोकळी निर्माण झाली. कर्त्या व जाणकार बुध्दिमान लोकांच्या अभावी व झपाट्याने झालेल्या कानडी करणामुळे हळूहळू कारवार हे लाचखोर व भ्रष्टाचारी नोकरशहा व राजकारणी लोकांच्या हातात सापडले. ज्या मी साम्यवादाच्या उदात्त (?) विचाराने आमच्या हजारो एकर जमीनी गरिबांमध्ये फुकट वाटल्या गेल्या होत्या. कारवारच्या लबाड सावकार / सोनार वगैरेनी नंतर त्याच जमीनी कवडीमोल किमतीत विकत घेऊन गरीब (?) शेतकऱ्यांना हाकलून लावले. ‘कसेल त्याची जमीन’ ह्या ब्रीदवाक्याऐवजी ‘नाडेल त्याची जमीन’ हे रुजू झाले. तिथे आज फार्म हाउसेस व रिसोर्ट उभे राहिले आहेत. पण गोवा जेव्हा १९६१ मध्ये स्वतंत्र झाला, तेव्हा मागच्यास ठेंच व पुढचा शहाणा या न्यायाने कसेल त्याची जमीन या कायद्याला बगल देण्यात आली. तिथे भाटकर व कुळे या दोघांचे हितसंबंध जोपासून नवीन जमीनकायदा अंमलात आणला गेला व मुख्यत: ब्राह्मण समाज व मुंडकार यांच्यात समन्वय साधला गेला. गोव्याच्या भरभराटीला त्यांनी हातभार लावला.



कारवार स्थानिकांचे हितसंबंध जोपासणारे खंबीर नेतृत्व यांच्या अभावामुळे बँगलोर, दिल्ली यांची मनमानी स्थानिकांना मुकाट्याने सहन करावी लागली. स्वार्थ, लोभ, बेईमानी, हेवेदावे, स्मगलिंग ही सगळी कुकर्मे कारवारच्या पाचवीलाच पुजली गेली. अंगुठा छाप मंडळी जात-पातचे भांडवल करून पुढे सरसावली. कारवारची जनता याखाली पूर्ण पिचून गेली. त्यात भर म्हणून की काय, कैगा हा अणुशक्ति प्रकल्प व सी-बर्ड हा नेवलबेस प्रकल्प कारवारला सुरू झाले. हजारों प्रकल्पग्रस्तांना आपल्या पिढीजात घर - जमिनींतून हुसकावून लावून, नाममात्र मोबदल्यात सरकारने त्यांच्या जमिनी बळकावल्या. या मेगा प्रकल्पांचा फायदा / तोटा झाला. कारवारच्या जमिनींचे भाव प्रत्येक ३/४ वर्षात दुप्पट व्हायला लागले व कारवारला गुन्हेगारी, व्यसनाधीनता यांच्या आहारी जाण्यास वेळ लागला नाही यावेळी मात्र कारवारच्या जुन्या जाणत्या लोकांना ब्राह्मण समाजाची आठवण आली व म्हणाले, ‘ते लोक असते तर अशी पाळी कारवारवर आली नसती’ भारांची कविता आता एका वेगळ्या संदर्भात म्हणावी लागली.

जन पळ भर म्हणतील, हाय हाय
आम्ही जाता म्हणाले बाय बाय !!
बामणांच्या सर्व जमिनी
आमका जाय जाय !!
तुम्ही ठेवले आम्हासाठी
काय नाय !!
रडला बिचारा बामण ढांय ढांय
पण सोशिले सगळे धाय धाय !!
झाला परागंदा, पण हिम्मत
हरिली नाय नाय !!
दाखवुनी बुध्दिकौशल्य, राखुनी ईमान,
झाले सगळे कीर्तिमान !!
गाजविला सारा देश
होऊन कर्तृत्ववान !!
द्या संदेश कारवारला
आता आम्ही म्हणतो हाय हाय
आम्ही जाता केलें कार्य काय ?

**– सुधीर तेलंग,** अंधेरी
९२२३४ ७८३११

## आमची सेवाव्रती ताई जयश्री भेडसगांवकर
## हिच्या ७० व्या वाढदिवसा निमित्त

या वर्षी २४ जूनला आमच्या ताईला म्हणजेच सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील जयश्री वसंत भेडसगांवकर हिला ७० पूर्ण झाली. गेल्यावर्षी मार्चमधे कोविड १९ सुरू झालं, लॉकडाऊन सुरू झालं आणि या सव्वावर्षातल्या तिच्या कामाच्या झपाट्याकडे पाहून आम्हीं दोघी, मी मंगल आणि आमची धाकटी बहीण नीलम अगदी थक्क होऊन गेलो. आणि तिचे लहानपणापासूनचे एक एक गूण आम्हाला आठवू लागले.

भावोजींच्या अचानक कंपनी बंद पडल्याने, आलेल्या प्रसंगाला तिने न डगमगता कणखरपणे तोंड दिले. तिच्या हाताला चव आणि स्वयंपाकाची आवड आणि कामाचा उरक, यामुळे जोगेश्वरीच्या सोसायटीत तिचे डबे जाऊ लागले. अल्पावधीतच तिच्या स्वयंपाकाच्या कौशल्याचं नाव झाले.

खास कारवारी पदार्थ, चवडे, कोहळ्याचे (वड्या) सांडगे, सांबार मसाला, कढिपत्ता चटणी ही तर तिची खासियत आहेच. शिवाय तिळाचे लाडू, पुरणपोळी, सांजोरी ह्यांना सुध्दा प्रचंड मागणी. तिच्या तोंडी 'कंटाळा' शब्दच कधी येत नाही.

या कोविडच्या काळात तर तिने उपसलेल्या कष्टांना तोडच नाही. कितीतरी घरात तिचे रोज वेगवेगळे नास्त्याचे डबे, दुपारच्या जेवणातही रोज वेगळं. शिवाय (मासे, मटण, चिकन) असाही मागणीप्रमाणे मेन्यू असतो. शिवाय खास आग्रहास्तव संध्याकाळचा नाश्ता, त्यांत बटाटेवडे, साबुदाणा वडे, भेळ, शेवपूरी दाबेली-असे अनेक प्रकार. हे करताना बेगमीचे प्रकार त्यांचं कुरीअर करून पाठवणं पण चालूच. आम्हाला खात्री आहे हे वाचताना सुध्दा कल्पनेनेच अनेकांना धाप लागली असणार. तिला Covid Warrior म्हटलं तरी अजिबात अतिशयोक्ती होणार नाही.

जेव्हां आपण जवळ असतो तेव्हां आपल्या माणसांचे गूण लक्षातच येत नाहीत. ताईने कधीच सासर माहेर असा भेदभाव केला नाही, जश्या आम्ही दोघी बहिणी तसेच तिच्या नणंद, जावा, दीर यांच्याशी सुध्दा तिचे सलोख्याचे संबंध आहेत. माणसे जोडणं हे कुणी ताईकडून शिकावं. शाळेपासूनच्या मैत्रीणींपासून आतापर्यंतच्या (त्यांत तरुण मैत्रीणींही आहेत.) मैत्रीणींचा तिचा प्रचंड संग्रह आहे. जोगेश्वरीच्या रामेश्वरमंदिराच्या शेजारीच घर असल्याने अभिषेकासाठी येणाऱ्या सुवासिनींचे कपडे बदलायचं हक्काचं घर म्हणजे जयश्रीचं. शिवाय त्या परत जाताना चहा, कॉफी तर देणारच शिवाय कोणाची



बायको गरोदर, असेल तर कौतुकानं ताजं लोणचंही बनवून देणार.

आमच्या ताईला फुलांची अतिशय आवड, मग तो मोगऱ्याचा गेरा, सुरंगीचा सोर असू दे नाहीतर फुल असू दे नाहीतर सेट्टाची वेणी हौसेने तिच्या लांबसडक केसावर माळणार. गेरे, वेणी तर कापडांत गुंडाळून फ्रिजमधे ठेऊन ३/४ दिवस वापरणार.

आपल्या एन.के.जी.एस.बी. संघाच्या हळदीकुंकू समारंभाची धुरा ती आणि तिच्या मैत्रिणी समर्थपणे सांभाळतातच, शिवाय मुंबई मंचच्या कारवारी मेळाव्यात तिचा सहभाग असतोच असतो. त्यामुळे तिला 'जयश्री' ह्या नावाने अनेक कारवारी लोक ओळखतात आणि एवढंच नाही तर आम्हां दोघींनाही, जयश्रीची बहीण म्हणूनच अनेकजण ओळखतात. त्याचा आम्हां दोघींनाही अभिमान आहे.

आयुष्यात बरीच संकटं, दु:खं पचवण्याची ताकद त्या रामेश्वरानेच दिली असं तिला वाटतं. कोविड काळातही ताईची कन्या (आयुषि) आणि नातू (अग्र) यांची खूपशी मदत झाली तिला. दोघांचही मनापासुन कौतुक. कुठच्याही परिस्थितीत मनात, जिभेवर कधी कडवटपणा येऊ दिला नाही तिने.

ताई, तुला ७०व्या वाढदिवसानिमित्त आमच्या दोघींकडून आणि आमच्या कुटुंबीयांकडून खूप शुभेच्छा. रामेश्वरा, असाच आमच्या ताईच्या पाठीशी उभा रहा रे बाबा.

| **मंगल पाटकर** | **नीलम राजाध्यक्ष** |
|---|---|
| ९८२०३ २५६८० | ९३२५७ ७५८३७ |

शब्दांकन : मंजिरी कुलकर्णी, ठाणे, ९६६५० ९८११७

## श्रद्धांजली


**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

३६ वे पुण्यस्मरण - निधन : रविवार२८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३६ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्री मंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्या तर्फे**

## डॉ. अशोक वागळे यांचे दुख:द निधन



जन्म: ७ ऑगस्ट १९३६–
निधन:२३ एप्रिल २०२१

कुर्डुवाडी सारख्या ग्रामीण भागात अद्ययावत रुग्णालय उभे करून हजारो रुग्ण बरे करणारे देवदूत डॉ. अशोक विनायक वागळे (वय–८५) यांचे २३ एप्रिल रोजी पुणे येथे निधन झाले. कुर्डुवाडीसारख्या ग्रामीण भागात तब्बल ४० वर्ष निस्पृहपणे वैद्यकीय सेवा दिली. जनरल सर्जन असतानाही त्यांनी कर्मभूमी म्हणून कुर्डुवाडीची निवड केली. त्या काळच्या दुष्काळी आणि मागास भागात ते आले होते. भलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून आपल्या मामाच्या शब्दाखातर ते कुर्डुवाडीत आले. कुर्डुवाडी नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्याकडे तपासणीसाठी कुर्डुवाडी येथे रुग्ण येत. त्या काळी अद्ययावत यंत्रणा नसतानाही त्यांच्या चिकित्सा शास्त्रामुळे अनेक रुग्ण बरे होत. केवळ आठ आणे एवढी फी ते प्रथम घेत. पैशाच्या मागे न धावता रुग्णसेवेत रमलेला एक देवदूत हरपला आहे. अशी प्रतिक्रिया कुर्डुवाडीच्या परिसरांत व्यक्त होत आहे. वयोमानाने त्यांनी पुणे येथे स्थलांतर केले होते, मात्र तेथेही कुर्डुवाडीचे रुग्ण विश्वासाने जात.

त्यांच्या निधनाची वार्ता सोलापूर परिसरांतील स्थानिक वृत्तपत्रांत ठळक रीतीने प्रसिध्द करण्यात आली होती. त्यांची लोकप्रियता एवढी होती की निधनानंतर २ मे रोजी आभासी पध्दतीने एक आदरांजली सभा भरविण्यांत आली, त्यात सुमारे चाळीस प्रतिष्ठीत मंडळीनी डॉ. वागळे बद्दलच्या कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या. या प्रतिष्ठीत मंडळींत स्थानिक खासदार, आमदार, नगराध्यक्ष, पत्रकार, शिक्षण क्षेत्रांतील तज्ज्ञ, समाजसेवक, वैद्यकीय क्षेत्रांतील सहकारी सहभागी होते.

३ ऑगस्ट १९९७ साली कुर्डुवाडी येथे त्यांच्यासाठी एक गौरव कृतज्ञता समारंभ भरविला होता. तेव्हां शंभर मैलाच्या परिसरांतील सात हजारांचा जनसमुदाय उपस्थित होता. त्याप्रसंगी स्थानिक दैनिकांतून खास पुरवणीही प्रकाशित झाल्या होत्या. यावरून त्यांच्या अफाट लोकप्रियतेची पावती मिळते. या समारंभास मुंबईतील प्रख्यात शल्यविशारद डॉ. व्ही. एन्. श्रीखंडे प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे 'जे का रंजले गांजले तोचि साधु ओळखावा –देव तेथेची जाणावा' ही उक्ती डॉ. वागळे या देवमाणसाला तंतोतंत लागू पडते.

१९९५ साली संघाच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या प्रसंगी डॉ. वागळे यांच्या असामान्य रुग्ण सेवेची दखल घेऊन आपल्या संघाने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत केले व समारंभाचे प्रमुख पाहुणे पद्मभूषण डॉ. पद्माकर दुभाषी यांच्या हस्ते डॉ. वागळे यांचा सत्कार केला.



## श्री. अरविन्द पिंगे यांना देवाज्ञा



जन्म : १६.९.१९३२ – निधन : ४.५.२०२१

ज्ञातीचे एक क्रियाशील हितचिंतक श्री. अरविन्द यशवंत पिंगे यांचे ४ मे रोजी दु:खद निधन झाले. ते कायद्याचे पदवीधर व कंपनी सेक्रेटरी होते. त्यांची संपूर्ण व्यावसायिक कारकीर्द बी.एस्.ई.एस्. या उद्योगसमूहात गेली . तिथे ते प्रदीर्घ काळ कंपनी सेक्रेटरी व फायनान्स डायरेक्टर या वरीष्ठ पदी होते. आकाऊंटस, फायनान्स, व टॅक्सेशन या क्षेत्रांत त्यांचा अनुभव दांडगा होता. बी.एस्.ई.एस्. कंपनीसाठी वित्त पुरवठा करण्यामध्यें त्यांची कामगिरी मोलाची होती.

आपल्या बँकेत तीन वर्षे ऑनररी सेक्रेटरी या पदावर त्यांनी काम केले होते. १९६१ ते ७० या दरम्यान ते बँकेच्या संचालक मंडळावर होते. त्यांच्याच अमदानीत बँकेने 'लक्ष्मी सदन' ही वास्तू एल.आय. सी. कडून मालकी तत्वावर लिलावात विकत घेण्याचा दूरदर्शी निर्णय घेण्याचा व तो कार्यान्वित करण्याचा पुढाकार त्यांनीच घेतला होता. बँकेला पिंगे यांचे एकूण तेरा वर्षे अमूल्य योगदान मिळाले.

**संघातर्फे श्री. पिंगे यांना भावपूर्ण श्रध्दांजली !**

## निधन

| | | |
|---|---|---|
| हीरा माधव बाळिगा | | |
| (पूर्वाश्रमीच्या हीरा नागेश(भोबेकाका) वाघ) | (सदाशिवगड) | बंगळूर |
| उदय शंकर बोरकर | (कडवाड) | वांद्रे |
| आदित्य उदय बोरकर | (कडवाड) | इंग्लंड |
| मंगेश वसंत देसाई | (व्हंडकल) | विरार |
| शांता(कुमुद )उमाकान्त(भाई) दिवेकर | (कणसगिरी) | घाटकोपर |
| दिलीप रघुनाथ गायतोंडे | (हळगे) | दादर |
| दीपक जगन्नाथ गायतोंडे | ( किन्नर) | ठाणे |
| मंगेश (मोहन) व्यंकटराव कंटक | (अंकोला) | ठाणे |
| शैला वसंत(दुर्गानंद) किन्नरकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या शशिकला विश्वनाथ तेलंग) | (बाड) | मडगांव |
| नितीन सुभाष (दीपक) कसबेकर | (खारगे) | वरळी |
| सुगंधा नारायण कसबेकर | (खारगे) | गिरगांव |

| | | |
|---|---|---|
| विमल (नलिनी) वैंकटराव कसबेकर | (कडवाड) | अंधेरी |
| रवीन्द्र यशवंत कसबेकर | (शिद्दर) | प्रभादेवी |
| सुमन गणपती कुलकर्णी | (हळगे) | मुंबई |
| नरसिंह चिदंबर मुझुमदार | (अंकोला) | जोगेश्वरी |
| इंदू मधुकर मुझुमदार | (अंकोला) | दादर |
| सुरेश रुद्रा नाडकर्णी | (मिर्जन) | मुलुंड |
| अभय महारुद्र नाडकर्णी | (सावरपै) | खारघर |
| अजित विठ्ठल नाडकर्णी | (हाणकोण) | दहिसर |
| शालन मधुकर नाडकर्णी | (मल्लापूर) | गोरेगांव |
| रामदास विनायक नाडकर्णी | (मल्लापूर) | पारले |
| अरविन्द यशवंत पिंगे | (सदाशिवगड) | वरळी |
| मीरा (गीता) प्राभाकर पिंगे | (कडवाड) | बोरीवली |
| उह्लास सदानंद पालेकर | (कडवाड) | फोंडा |
| उमाबाई विश्वंभर सोहोनी | (गांवगेरी) | अंधेरी |
| प्रसन्न माधव तेलंग | (कडवाड) | मालाड |
| रमेश दिनकर तेलंग | (केरवडी) | ठाणे |
| उह्लास वसंत तेलंग | (केरवडी) | वांद्रे |
| विठ्ठल रघुनाथ तेलंग | (हारवाडे) | बंगळूर |
| हेमलता प्रभाकर तिळवे | | |
| (पूर्वाश्रमीच्या हेमलता आनंद मुझुमदार) | (अंकोला) | पारले |
| हरीहर काशिनाथ वैष्णव | (सदाशिवगड) | शिवाजी पार्क |
| जयश्री जगदीश वागळे | (माजाळी) | मालाड |
| अशोक विनायक वागळे | (माजाळी) | पुणे |
| दत्तात्रय गंगाधर वागळे | (माजाळी) | ठाणे |
| यशवंत गोविन्द वागळे | (बाड) | जोगेश्वरी |
| मंगेश जगन्नाथ वागळे | (बाड) | अबुधाबी |
| नरेन्द्र काशिनाथ वर्टी | (सदाशिवगड) | नाशिक |
| शिरीष यशवंत वर्टी | (सदाशिवगड) | गोरेगांव |
| शंकर मंगेश वर्टी | (सदाशिवगड) | पुणे |
| वसंत विश्वनाथ वर्टी | (सदाशिवगड) | पारले |
| शेखर प्रभाकर वर्टी | (बाड) | गुरगांव |



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

### उल्लेखनीय देणग्या

**श्रीमती इंदू मुझुमदार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी**

दादर पूर्व येथे राहणाऱ्या श्रीमती इंदू मधुकर मुझुमदार यांचे ३० एप्रिल रोजी वयाच्या १०५ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी आपला संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला व त्यांचे आशीर्वाद घेतले. अलीकडेच त्यांचे पुत्र सर्वश्री अरुण, अनिल व किशोर व कन्या श्रीमती लता विठ्ठल पालेकर यांनी इंदूमामींच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती नन्दिनी मुझुमदार यांजकडून एक लाख रुपयांची देणगी**

पुणे येथे वास्तव्याला असणाऱ्या श्रीमती नन्दिनी जयप्रकाश मुझुमदार यांनी अलीकडेच एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील पन्नास हजार रुपये आई श्रीमती विमल कमलाकर वाघ यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाजसेवा निधीसाठी आहेत व ऊर्वरित पन्नास हजार रुपये वडील श्री. कमलाकर रुद्रा वाघ यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी आहेत.

**श्री. अरुणकुमार गायतोंडे यांच्या कडून सत्तर हजार रुपयांची देणगी**

मुलुंड येथे राहणारे संघाचे एक हितचिंतक श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे दरवर्षी आपल्या बहिणींच्या स्मृतीप्रीत्यर्थ देणग्या देत असतात. अलीकडेच त्यांनी आपल्या चार बहिणींच्या स्मृतीप्रीत्यर्थ एकूण सत्तर हजार रुपयांची देणगी दिली आहे. श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी वृध्दसेवा निधीसाठी वीस हजार रुपयांची देणगी दिली आहे. तर इतर बहिणी श्रीमती उषा प्रभाकर फडणीस, सुनीती सुरेश शहापूरकर व ललिता माधव वागळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांचा सविस्तर तपशील देणगीदारांच्या यादींत दिला आहे.

**श्री. महारुद्र कसबेकर यांच्या स्मरणार्थ वृध्दसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी**

सुमन नगर, चेंबूर येथे राहणारे श्री. महारुद्र कृष्णराव कसबेकर यांचे जून २००७ मध्ये वयाच्या १०५ व्या वर्षी निधन झाले. ९९ संपून १०० वे वर्ष जेव्हां त्यांना लागले तेव्हां ३१डिसेंबर २००१ रोजी संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला व त्यांच्याकडून आशीर्वाद प्राप्त केले. अलीकडेच त्यांच्या १४ व्या पुण्यतिथीप्रसंगी पुत्र श्री. अरविन्द व कन्या श्रीमती सुमन ध्रुवकांत देसाई यांनी वृध्दसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | एन् के जी एस बी को ऑप बँकेकडून २०२० – २१ करिता | १०,००० |
| २ | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दिगंबर मारुती कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ३ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १२ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ४ | श्री सदानंद कृष्णा देसाई यांजकडून | १२,००० |
| ५ | श्री सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्त नाती श्रीमती सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ६ | कुमारी शामोलीच्या वाढदिवसाच्या प्रसंगी वडील श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ५,००१ |
| ७ | श्रीमती अनुराधा (निर्मल) बाळकृष्ण वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त बहिणींकडून | २,००१ |
| ८ | श्रीमती गंगाबाई व श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त नाडकर्णी कुटुंबीयांकडून | ३,००१ |
| ९ | श्री अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती शामल यांजकडून | ३,००१ |
| | कन्या श्रीमती विद्या व जामात श्री मनोज गो. भांडारकर यांजकडून | ५,००१ |
| १० | श्रीमती इंदिरा सदानंद कुलकर्णी यांच्या ७५ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री शांताराम (अरुण) सदानंद कुलकर्णी यांजकडून | ७,५०५ |
| ११ | श्रीमती नीलम शांताराम कुलकर्णी यांच्या १ ल्या पुण्यतिथी निमित्त पती श्री शांताराम (अरुण) सदानंद कुलकर्णी यांजकडून | ५,००५ |
| १२ | श्रीमती विमल कमलाकर वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती नंदिनी जयप्रकाश मुझुमदार यांजकडून | ५०,००० |
| १३ | अनामिकाकडून | |
| | **खालील व्यक्तींच्या स्मृतीप्रीत्यर्थ** | |
| | – श्रीमती इंदू सदानंद नाडकर्णी | १०,००१ |
| | – श्रीमती कुमुद शंकर नाडकर्णी | १,००१ |
| | – श्री. राजेन्द्र देवीदास कसबेकर | १,००१ |
| | – श्री. वसंत मनोहर नाडकर्णी | १,००१ |
| | **खालील व्यक्तींच्या वाढदिवसाप्रसंगी** | |
| | – श्रीमती सुलभा विनय (मोरेश्वर)नाडकर्णी | १,००१ |



| | | |
|---|---|---|
| | – श्रीमती शरयू दत्तात्रय नाडकर्णी | १,००१ |
| | – श्रीमती शैला पांडुरंग (आपा) नाडकर्णी | १,००१ |

## वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. महारुद्र कृष्णराव कसबेकर यांच्या १४ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अरविंद व कन्या श्रीमती सुमन ध्रुवकांत देसाई यांजकडून | ५०,००० |
| *२ | श्रीमती नेहा शिवानंद वागळे यांजकडून | ५,००० |
| ३ | श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १९ व २० व्या पुण्यतिथी निमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | २०,००० |
| ४ | श्रीमती राजश्री व श्री. रमेश गणपत कुलकर्णी यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त | १०,००० |
| ५ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १२ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ६ | श्रीमती शांता(माई) व श्री. मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाह दिनाच्या प्रसंगी त्यांच्या कन्या श्रीमती शुभदा वागळे (गीता नेत्रावळी) यांजकडून | २९,००० |
| ७ | श्री. कमलाकर रुद्रा वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती नंदीनी जयप्रकाश मुझुमदार यांजकडून | ५०,००० |
| ८ | श्री. मधुकर व्यंकटराव नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी प्रसंगी पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | २,००१ |
| ९ | आई वडील श्रीमती शांताबाई व श्री. शेषगिरी भास्कर नाडकर्णी व भाऊ श्री. शिवानंद यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्रीमती कुंदा रघुवीर देसाई यांजकडून | १०,००० |
| १० | श्रीमती इंदू मधुकर मुझुमदार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुलगे सर्वश्री अरुण, अनिल व किशोर व कन्या श्रीमती लता विठ्ठल पालेकर यांजकडून | १,००,००१ |
| ११ | श्री.विनायक मंगेश मुझुमदार यांजकडून आई श्रीमती सविता मंगेश मुझुमदार यांच्या इच्छेनुसार | १०,००० |
| | काका श्री. मनोहर गोविन्द मुझुमदार यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ | २५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी अजिथ नायक यांजकडून | २,००० |
| २ | श्री गोविंद मारुति कसबेकर यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री विनय यांजकडून | ३,००० |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री. विश्वंभर त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. देवीदास यांजकडून | ५,००० |

**एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,५०१ |
| २ | श्रीमती लीला व श्री. नारायण श्रीपाद कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. महारुद्र यांजकडून | १५,००० |
| ३ | श्री. अरुण विश्वंभर गायतोंडे यांच्याकडून तीन बहिणींच्या स्मृतीप्रीत्यर्थ | |
| | – श्रीमती उषा प्रभाकर फडणीस यांच्या १० पुण्यतिथी निमित्त | १०,००० |
| | – श्रीमती सुनीती सुरेश शाहपूरकर यांच्या ६ व ७ व्या पुण्यतिथी निमित्त | २०,००० |
| | – श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या २३ व २४ व्या पुण्यतिथी निमित्त | २०,००० |
| ४ | एन्.के.जी.एस्.बी. को–ऑप बँकेकडून २०२०–२१ करिता | १०,००० |
| ५ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १२ व्या पुण्यतिथी निमित्त यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ६ | श्रीमती अनुराधा (निर्मल) बाळकृष्ण वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त बहिणींकडून | २,००१ |
| ७ | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | १,००१ |
| ८ | श्री. मधुकर व्यंकटराव नाडकर्णी व श्रीमती राधाबाई व्यंकटराव नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी प्रसंगी स्नुषा श्रीमती माधुरी यांजकडून | २,००१ |
| ९ | डॉ. शांताकुमार ज्ञानेश्वर भांडारकर यांच्या स्मरणार्थ श्री. मनोज व श्रीमती मृदुला गोविंद भांडारकर यांजकडून | १,५०० |
| १० | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | ८,००० |
| ११ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ११व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |

## देणगीदारांना सूचना

* काही हितचिंतक संघाच्या बँक खात्यात देणगीदाखल रकमा जमा करतात. अशा व्यक्तींचा पत्ता व इतर तपशील उपलब्ध होत नाही. अशा देणगीदारांनी संघाच्या ई मेलवर तपशील पाठविण्याची कृपा करावी किवा कार्यालयांत श्रीमती भांडारकर यांच्याशी संपर्क साधावा.



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80


**NKGSB Bank**
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century

## Multiple Rewardz in One Fixed Deposit



w.e.f. 19.04.2021

| From 1 - 2 yrs | Above 2 - 5 yrs | Above 5 - 10 yrs |
|---|---|---|
| General Public 5.60% p.a. | General Public 5.75% p.a. | General Public 5.85% p.a. |
| Senior Citizen 5.85% p.a. | Senior Citizen 6.00% p.a. | Senior Citizen 6.35% p.a. |

- Higher Interest for Longer Period
- Choice of Monthly (Discounted) / Quarterly / Maturity Interest Payout
- Higher Yield over Card Rate on Interest Reinvestment Plan
- Instant Liquidity in case of urgency
- Convenient booking through our Quick Mobil App / Net Banking
- Avail Exciting Offers on FD / RD creation via Quick Mobil App
- Auto-Sweep facility available in multiples of INR 1000

T&C Apply.

Rates are applicable for Fixed Deposits in India only.

www.nkgsb-bank.com

Call us: 022 28602000


हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.